# सोलापूर ग्रामीण पोलीस दल, प्रेस नोट दि.३१/०३/२०२०

Email. ID- prosolapurrural@gmail.com
Control Room Phone No. 0217-2732009, 0217-2732010

## सर्व प्रकारच्या माल वाहतुकी संदर्भाने सुचना

मा. गृह सचिव, भारत सरकार यांचेकडील अ.शा.पत्र क्र. ४०-३/२०२०/-DM-I(A), दि. २९/०३/२०२० अन्वये **सर्व प्रकारच्या माल वाहतुकी** संदर्भात सुचना दिलेल्या आहेत. तरी सर्व मालवाहतुक वाहनांचे मालक (Transport owners) व शेतकरी यांनी कृपया खालीलप्रमाणे नोंद घ्यावी.

१. **सर्व प्रकारची माल वाहतुक करणारी वाहने भारतात कोठेही वस्तु ने-आण करणेसाठी प्रवास करु शकतात.** त्यांना **पासची** आवश्यकता लागणार **नाही.**
२. माल वाहतुक करणारे वाहनाचे समोरील काचेच्या डावे बाजुस ''माल वाहतुक'' किंवा ''Goods Transport'' असा कागदी बोर्ड लावावा.
३. **माल वाहतुकीचे वाहनातुन प्रवाशी वाहतुक करता येणार नाही.**
४. अवैध प्रवाशी वाहतुक चेक करण्याचे कारणाव्यतिरिक्त सर्व प्रकारची माल वाहतुकीची वाहने **पोलीस अडविणार नाहीत.**
५. सदर कालावधीत माल वाहतुक करणारे वाहनाचे परमीट व टॅक्स इ. कागदपत्रे पोलीस तपासणार नाहीत.

## सर्व प्रकारची माल वाहतुक करणा-या वाहनांना पेट्रोल/डिझेल देणेबाबत.

१. मा. जिल्हादंडाधिकारी, सोलापूर यांचेकडील जा.क्र. २०२०/डिसीबी/२/आरआर/२०१८, दि. २३/०३/२०२० अन्वये फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये घोषणापत्र प्रसारित/जारी केले आहे. तसेच मा. गृह सचिव, भारत सरकार यांनी जारी केलेल्या आदेशामध्ये दिलेल्या सुचनाचे पेट्रोल पंप चालकांनी पालन करुन त्याप्रमाणे कार्यवाही करावी.
२. सर्व प्रकारची माल वाहतुक करणा-या वाहनांना पेट्रोल/डिझेल देण्यात यावे. **उदा. माल वाहतुक करणारी तीनचाकी, चारचाकी, पांढरा हत्ती, पिकअप, टेम्पो, ट्रक, कंटेनर** इ. वाहने
३. तसेच सोलापूर ग्रामीण पोलीस दलाकडुन देण्यात आलेल्या पासधारकांना **पासमध्ये नमुद केलेल्या वाहनास** पेट्रोल/डिझेल देण्यात यावे.

## रजिस्ट्रेशन, फिटनेस सर्टिफिकेट, परमीट, ड्रायव्हींग लायसेन्सला मुदतवाढ

Ministry of Road Transport and Highways (MVL Section), भारत सरकार यांचेकडील जा. क्र. RT-11012/02/2019-MVL(pt-8), दि. ३०/०३/२०२० अन्वये ज्या वाहनांचे रजिस्ट्रेशन, फिटनेस सर्टिफिकेट, परमीट तसेच ड्रायव्हींग लायसेन्स याची मुदत ३१ मार्च २०२० पर्यंत वैध आहे, त्यांना ३० जुन २०२० पर्यंत मुदतवाढ देण्याचे निर्देश दिले आहेत. सदर निर्देशाचे पालन करुन लोकांना कुठलाही त्रास होणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.

Scanned with CamScanner

## माल वाहतुक (RTO) यांचेकडील पास बाबत

१. जर कोणास माल वाहतुकीबाबत शंका असल्यास (RTO) यांचेकडुन माल वाहतुकीबाबत पास घेवु शकतात. परंतु पास घेणे बंधनकारक नाही.

२. Ministry of Home Affairs यांचेकडील गाईडलाईन नुसार सर्व प्रकारच्या माल वाहतुकीसाठी वाहनाचे पासेस उप प्रादेशिक परिवहन विभाग (RTO) यांचेकडुन देण्यात येत आहेत. त्यासाठी १. गाडीचे आरसी बुक, २.गाडीचे फिटनेस सर्टीफिकेट, ३.विम्याची कागदपत्रे, ४.वाहनचालकाचे लायसन, ५.विहीत नमुन्यातील अर्ज खालील नमुद ईमेलवर सादर करावेत.

३. **पंढरपूर, बार्शी, उत्तर सोलापूर, दक्षीण सोलापूर, मंगळवेढा, अक्कलकोट व मोहोळ** तालुक्यासाठी माल वाहतुकीसाठी वाहनाचे पासेस उपप्रादेशिक परिवहन विभाग (RTO) यांचेकडील **mh13@mahatranscom.in** या ईमेलवर अर्ज सादर करावेत.

४. **माळशिरस, सांगोला, माढा व करमाळा** तालुक्यासाठी माल वाहतुकीसाठी वाहनाचे पासेस उप प्रादेशिक परिवहन विभाग (RTO) यांचेकडील **mh45@mahatranscom.in** या ईमेलवर अर्ज सादर करावेत.

## मनुष्य वाहतुकीसाठी पास बाबत

१. सोलापूर ग्रामीण जिल्हयातील **अत्यावश्यक वस्तु, सुविधा व सेवा पुरविणा-या** फक्त **मनुष्य वाहतुकीसाठी** पासेस देण्यात येतील. त्यांनी दुचाकी, चारचाकी **(LMV)**, प्रवाशी बस इ. चा वापर करावा.

२. अशा प्रकारचे पासेस संबंधित **पोलीस ठाणे** मधुन तसेच **उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय** येथुन देखील देण्यात येतील.

३. माल वाहतुक करणा-या कोणत्याही वाहनांना **पासची आवश्यकता नाही.**

४. अत्यावश्यक वस्तुमधील पेट्रोल पंप, कारखाने, होलसेल/किरकोळ माल विक्रेते यांनी **एकच ग्रुप पासची** मागणी करावी. त्यांनी त्यांचेकडील कर्मचारी यांची एकाच वाहनातुन ने-आण करावी.

५. ऑनलाईन पाससाठी सोलापूर ग्रामीण पोलीस दलाचे **https://solapurpolice.gov.in** या वेबसाईटवर **Emergency Service Pass** येथे ऑनलाईन अर्ज सादर करावेत.

अत्यावश्यक वस्तुची वाहतुक करताना ज्यावेळी आपणास काही अडचण आल्यास पोलीस नियंत्रण कक्ष च्या १०० नंबरवर कॉल करावा. आपणास योग्य ती मदत दिली जाईल.

(मनोज पाटील)
पोलीस अधिक्षक, सोलापूर ग्रामीण

प्रति,
मा. संपादक,
नमुद बातमी आपले लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द होणेस विनंती आहे.

Scanned with CamScanner